संदर्भ क्र.सुरमं/डीए/आरएमपी/२०१२-११८५.

सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरिता
कॉपर रोलर्स प्रा.लि. कंपाऊंड, २रा मजला,
एल.बी.एस. मार्ग, भांडुप (पश्चिम),
मुंबई - ४०० ०७८.

दूर.२५९१४८९०१/२५९१४८१७२/२५९१४०५३२,फॅक्स क्र.२५९१४८८४२

दिनांक : ८ फेब्रुवारी, २०१२

## आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि. १ जानेवारी, २०१२ पासून करण्यांत येणारी सुधारणा.**

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/डीए/आरएमपी/२०११-४८१८, दि.६.८.२०११ च्या आदेशान्वये दि. १ जुलै २०११ ते दि.३१ डिसेंबर २०११ या कालावधीकरीतां निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/विवेअ/विभ/२०१२-१/कार्या-१०, दि. ३.२.२०१२ अन्वये दि.१ जानेवारी २०१२ ते दि.३० जून २०१२ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्त्याचा दर रु.१,००४.४० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि.८.२.२०१२ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि.१ जानेवारी २०१२ ते दि.३० जून २०१२ या कालावधीकरीतां रु.१,००४.४० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) ५% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला असून सदरहू घरभाडे भत्ता दि.१ जानेवारी २०१२ ते दि.३० जून २०१२ या कालावधीकरीतां असेल.

नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.४८१८, दि.६ ऑगस्ट २०११ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

**दि.१ जानेवारी २०१२ ते दि.३० जून २०१२ या कालावधीकरीतां वेतन व भत्ते यांचा तक्ता.**

| अ. क्र. | सु.रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरक्षा रक्षक | ५६००.०० | १००४.४० | ३३०.०० | ३००.०० | २००.०० | ७४३४.४० |
| २. | मुख्य सुरक्षा रक्षक | ५८७५.०० | १००४.४० | ३४४.०० | ३००.०० | २००.०० | ७७२३.४० |
| ३. | सुरक्षा पर्यवेक्षक | ६५७५.०० | १००४.४० | ३७९.०० | ३००.०० | २००.०० | ८४५८.४० |
| ४. | सहा.सु. अधिकारी | ६८००.०० | १००४.४० | ३९०.०० | ३००.०० | २००.०० | ८६९४.४० |
| ५. | सुरक्षा अधिकारी | ७२५०.०० | १००४.४० | ४१३.०० | ३००.०० | २००.०० | ९१६७.४० |
| ६. | मुख्य सुरक्षा अधिकारी | ७७००.०० | १००४.४० | ४३५.०० | ३००.०० | २००.०० | ९६३९.४० |

*मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन

....२

नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

सर्व नोंदीत मुख्य मालकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे दि.१ जानेवारी, २०१२ पासून वेतन, भत्ते व त्यावरील लेव्ही सुधारीत दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

Security Guards Board for Gr. Mumbai & Thane Dist. Bhandup

(र.मो. परदेशी)
**अध्यक्ष**
सुरक्षा रक्षक मंडळ
बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हयाकरिता.

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**

.....................................................

.....................................................

.....................................................

.....................................................

नोंदणी क्रमांक : युनिट :